# शासकीय तंत्रनिकेतन येथे अभियांत्रिकी दिन

सेंदूरवाफा ■ प्रतिनिधी

शासकीय तंत्रनिकेतन संस्था साकोली येथे भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वराय्या यांची जयंती अभियांत्रिकी दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर सामाजिक अंतर व इतर नियमांचे पालन करून हे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. अशोक उपाध्याय होते. प्रमुख अतिथी म्हणून से.नि.प्राध्या. महादेव गायधने, प्रमुख मार्गदर्शक म्हणून अणूविद्युत विभाग प्रमुख आर.व्ही. येनकर उपस्थित होते. सर्व प्रथम डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमांना माल्यार्पन करून आदरांजली वाहण्यात आली.

डॉ. अशोक उपाध्याय यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, संस्थेतील प्राध्यापकांनी विश्वेश्वराय्या यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून उत्तम विद्यार्थी घडविण्याकरीता प्रयत्नशील राहण्याचा संकल्प करावा. महादेव गायधने यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण, व्यक्तीगत विकास व शिक्षकांची जबाबदारी या विषयांवर मार्गदर्शन केले. येनकर यांनी प्राध्यापकांनी निव्वळ पुस्तकी पंडीत न बनता सभोवतालच्या परिस्थितीशी समरस होवून विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती बाळगण्यासाठी प्रयत्न करावा असे सांगितले. काटकर यांनी सुध्दा यावेळी मार्गदर्शन केले. संचालन ए. जे. खोब्रागडे यांनी तर आभार डी. एच.पाटील यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जी. आर. देवाळकर, अहेर, ए. डी. गोवर्धन, जी. डी. गायकवाड, ए. एन. गजभिये व इतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

Scanned with CamScanner